सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मानुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४०९ ठ. क्र. ११
दि. २२/३/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



प्र.क्र. १८ मध्ये विडी घरकुल येथील संभाजीराव शिंदे शाळेसमोरील ओपन जागेत पूर्वीपासून भाजी व इतर विक्रेत्यांसाठी वापरण्यात येत आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांची सोय झाली आहे. तरी यापुढेही ही जागा भाजी मंडई म्हणून वापरण्यात यावे यांस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४१० ठ. क्र. ९३
दि. २२।४।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



सोलापूर शहराचे स्मार्ट सिटीमध्ये समावेश झाल्याने विजापूर रोड येथील संभाजी तलाव व त्या भोवतालचा परिसर निसर्गरम्य व आकर्षक व प्रेक्षणीय स्थळ निर्माण होण्यासाठी, सोलापूर TWIN सिटीचा भाग या सदरात असल्याने हैद्राबाद येथील हुसेन सागर धर्तीवर संभाजी तलावाच्या मध्यभागी भगवान गौतम बुध्दांचा पुर्णाकृती (उभा) पुतळा बसविल्यास सोलापूरच्या सौंदर्यात निश्चितच भर पडेल व सदर परिसरात पर्यटन-स्थळाचे महत्व प्राप्त होईल. संपूर्ण महाराष्ट्रात भगवान गौतम बुध्दांचा पुर्णाकृती उभा पुतळा कुठेही नसून प्रथम तो सोलापूरात उभा केल्यास त्याचे श्रेय आपणास व सोलापूर महानगरपालिकेस निश्चीतच जाईल तरी तथागत भगवान गौतम बुध्दांचा पुर्णाकृती पुतळा उभा करण्यास व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुला/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३९२ ठ. क्र. ९४
दि. २२।४।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेत ठ.क्र.६० दि.१६/०४/२०१५ रोजी हुतात्मा कुर्बान हुसैन हॉल जोडभावी पेठ, मंगळवार बाजर येथे बांधण्यात आलेले आहे. सदरच्या हॉलचे काम संपूर्ण पणे झाले असून, सदर हॉल आता सध्या बंद स्थितीत आहे. सदर परिसरात राहणा-या गोर-गरीब नागरीकांना शैक्षणिक व इतर सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी हुतात्मा कुर्बान हुसैन बहुउद्देशिय सामाजिक संस्था जोडभावी पेठ सोलापूर या रजिस्टर्ड संस्थेस किमान भाडे आकारुन देण्यात आलेली आहे. तसेच सदर हॉलचे यापुढील लाईट बिल पाणी बिल, हॉलचे मेंन्टेन्स सदर संस्था करणार आहे. या अटीवर देण्यासही मान्याता देण्यात आलेली होती. तरी सदर ठरावात हुतात्मा कुर्बान हुसैन हॉल असे नाव नमुद न करता त्या नावात दुरुस्ती करुन **शहिद अ.रसुल कुर्बान हुसैन बहुद्देशिय सामाजसेवी संस्था सोलापूर** असे नमुद करण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ३९३ ठ. क्र. ९५
दि. २२/७/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३९३

सोलापूर महानगरपालिका शहरातील कचरा संकलनाकामी पूर्वीचे चारसह आणखी चार मक्तेदाराची ६७ (३) (क) अन्वये नेमणूक करण्यात आली आहे व तद्नंतर बेकायदेशीररित्या तीन महिन्याप्रमाणे तीन वेळेला मुदतवाढ देण्यात आली आहे. या सर्व अनियमीत कारभाराचे, सर्व कागदपत्र व त्यावर मा. आयुक्तसाो यांचे टिप्पणीसह सर्व माहिती व कागदपत्रे १५ दिवसाचे आत सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.व. ३९१ ठ. क्र. ९६
दि. २२।४।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



श्री. वसंत दामाजी सरवदे, रहा. केगांव, सोलापूर हे सोलापूरचे रहिवासी असून, त्यांनी भारतीय ऑलिंपिक महासंघाच्या अधिपत्याखाली दिनांक ३१ जानेवारी ते १४ फेब्रुवारी २०१५ दरम्यान केरळ राज्यात संपन्न झालेल्या ३५ व्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत राष्ट्रीय पदक प्राप्त केल्याबद्दल तसेच महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेमध्ये सन २०१३, सन २०१४ व सन २०१५ या तीनही वर्षात सहभाग घेऊन प्राविण्य प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. त्यांचे महानगरपालिकेचे वतीने अभिनंदन करणेत येत असून, त्यांचे खेळातील कौशल्य व समयसुचकता यामुळेच ते या स्पर्धेत राष्ट्रीय पदाकाचे मानकरी ठरले असून, राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रिडा क्षेत्रात महाराष्ट्र राज्याचा ठसा उमटविणारी ही कामगिरी अत्यंत गौरवास्पद आणि कौतुकास्पद असून, राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंना प्रेरणा देणारी अशी असल्याने त्यांच्या या उज्वल यशाबद्दल सोलापूर महानगरपालिकेचे वतीने र.रु. ५१,०००/- इतकी रोख रक्कम व पारितोषिक प्रदान करण्यांस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासंगो~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ३९४ ठ. क्र. ९८
दि. २२।३।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ०९ ब मध्ये खडक गल्ली बाळे, सोलापूर येथील ठिकाणी **जय मल्हार** प्रवेशद्वार करुन त्यास नामकरण करण्यास सदर ठिकाणी नामफलक लावणेस, याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव वगळणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३९५ ठ. क्र. १९
दि. २२/४/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ०९ ब मध्ये संतोष नगर, बाळे, बार्शी सोलापूर या ठिकाणी पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर प्रवेशद्वारला नामकरण करण्यास, सदर ठिकाणी नामफलक लावणेस, याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव वगळणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४९९ ठ. क्र. २२
दि. २२/७/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंतीच्या निमित्ताने बुधवार पेठ, मिलींद नगर थोरला राजवाडा येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमीच्या परिसरामध्ये विविध कामे म्हणजे भित्तीशिल्प, अर्धपुतळा, गाभा-याचे वाढीव कामे करणे, दर्शनी भागात फायबर सीट बसविणे, लाईटींगची कामे इत्यादी कामे करणे अत्यंत गरजेचे असून, तातडीने वरील कामे पुर्ण करणेकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करुन याकामी येणारा खर्च सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील पुतळे परिसर सुधारणा करणे व पुतळे बसविणे या बजेट सदरातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.४०२ठ. क्र..२२..
दि...२४/१/१६......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जुना बोरामणी नाका हैद्राबाद चौकाजवळ सोलापूर महानगरपालिकेच्या दवाखान्यालगत असलेल्या खुल्या जागेत खालील अपंग व विधवा व्यक्तींना १) सुरेश सावंत २) शोभा लक्ष्मण उगाडे ३) बाबू नराल ४) भाऊसाहेब डोलारे गाळे बांधून देण्यात यावे व त्यांच्याकडून घेण्यात येणा-या डिपॉझीट रक्कमेतून पहिल्या मजल्यावर येथील नागरिकांसाठी व्यायामशाळा (जीम) बांधण्यात यावे जेणेकरुन या परिसरातील नागरिकांना सार्वजनिक कामासाठी याचा वापर करता येईल. तरी वरील व्यक्तींना गाळे बांधून देणेस व त्यांच्याकडून घेण्यात येणा-या डिपॉझीट रक्कमेतून पहिल्या मजल्यावर तरुण पिढीसाठी व्यायामशाळा (जीम) बांधणेस व याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका